डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक.

# जिव्हाळा

एक स्नेहबंध ....

वर्ष ३ रे अंक ११ वा
जानेवारी २०१४




anali U. Bapat
4, Bhavik Apartment
Samarth Nagar, Nashik-05
Contact:2355924

सकाळ
मुंबई, रविवार,
२ फेब्रुवारी २०१४

माध्यम प्रायोजक
www.esakal.com
सकाळ

# मालमत्ता निर्माण करणारे अर्थशास्त्र देशाला हवे

## डॉ. विनायक गोविलकर यांचे मत; डॉ. रामचंद्र पारनेरकर अर्थशास्त्र पुरस्कारांचे वितरण




माणसाच्या सातत्याने वाढणाऱ्या गरजा आणि त्या पूर्ण करण्यासाठी मर्यादित असणारी संसाधने यामुळे गरजांचा अग्रक्रम लावून त्यानुसार त्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक तेवढ्याच संसाधनांचा वापर करायला शिकणे गरजेचे आहे. त्यासाठी देशाला मालमत्ता निर्माण करणारे अर्थशास्त्र हवे असे मत अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांनी येथे व्यक्त केले. यंदाचा डॉ. रामचंद्र पारनेरकर अर्थशास्त्र पुरस्कार डॉ. गोविलकर यांना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू श्री. राजन वेळूकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या पुरस्काराचे हे सहावे वर्ष आहे. पूर्णवाद लाईफ मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दादर येथील बी.एन. वैद्य सभागृहात झालेल्या या समारंभासाठी भारतीय आयुर्विमा महामंडळ (एलआयसी) सहप्रायोजक म्हणून तर 'सकाळ' माध्यम प्रायोजक होते. कार्यक्रमाची सुरुवात अवधूत फडके यांच्या बासरीवादनाने झाली. 'पूरिया धनश्री' रागातील बंदिशीने वादनाला सुरुवात झाली. त्यानंतर प्रसिद्ध 'पायलियाँ झनकार' ही चीज बासरीवर वाजवून त्यांनी सर्वांना सुखद धक्का दिला. याला प्रसाद पाध्ये यांनी समरसून तबला साथ दिली. निसर्गाने संसाधने चक्रिय पद्धतीने तयार केली आहेत. आपण मात्र ती रेखीय पद्धतीने वापरत आहोत. अर्थशास्त्राचा मूळ उद्देश मानवाच्या गरजा भागवणे हा आहे. परंतु आज तो मागे पडून हाव शमविण्यासाठी आपण अर्थशास्त्राला वेठीस धरले आहे. संपत्तीची निर्मिती, वितरण आणि वापर यासाठी अर्थशास्त्राची गरज आहे. भरपूर उत्पादन, सम्यक वितरण व संयमित उपभोग अशी आदर्श अर्थशास्त्राची त्रिसुत्री गोविलकरांनी यावेळी सांगितली. ज्याला त्याला आपापल्या मगदुराप्रमाणे सुख मिळावे व ते उपभोगण्यासाठी शांतता मिळावी हे अर्थशास्त्राचे मूलतत्त्व आहे. याकडेही त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. डॉ. रामचंद्र पारनेरकर या विद्वानाच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ॲड. विष्णू पारनेरकर, यमाजी मालकर, लक्ष्मीकांत पारनेरकर, पळनीटकर आणि डॉ. आशुतोष रारावीकर यावेळी उपस्थित होते. रारावीकर यांनी अत्यंत ओजस्वी वाणीत डॉ. गोविलकरांचा परिचय करून दिला. डॉ. रामचंद्र पारनेरकर यांनी समाजाला डोळस व तर्कज्ञानावर आधारित श्रद्धा शिकवली याचा उल्लेख करून पारनेरकरांनी पूर्णवादाचा सिद्धांत निर्माण करून त्याद्वारे मनातील संवेदनेची जोड अर्थशास्त्राला दिली याचा आवर्जून उल्लेख केला. राजन वेळूकर म्हणाले, "मी-माझे यापलीकडे जाऊन पाहिले पाहिजे." 'पूर्णवाद युवा फोरम'च्या प्रयत्नांनी साकार झालेल्या स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. पूर्णवादाचे उपासक यावेळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंत रारावीकर, न्यायमूर्ती पुराणिक, न्यायमूर्ती गिरीधारी, आयबीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन टांकसाळे, गणेश पारनेरकर यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**डॉ. विनायक गोविलकर हे श्रीगुरुजी रुग्णालय संचालन समितीचे अध्यक्ष आहेत.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
**श्रीगुरुजी रुग्णालय**
आनंदवल्ली चौक, गंगापूर रोड,
नाशिक - ४२२०१३.
दूरध्वनी - २३४२४०१, २३४३४०१
मो. : ८३८००११२८६
**www.shrigurujirugnalaya.com**

जिव्हाळा - त्रैमासिक

वर्ष ३ रे, अंक ११ वा, जानेवारी २०१४

मार्गदर्शक
**डॉ. विनायक गोविलकर**
संपादक
**श्री रवींद्र बेडेकर (८३८००११२८४)**
ravibedekar@yahoo.com
मुद्रक/प्रकाशक
**श्री प्रवीण बुरकुले (९८२२०५७४९१)**
कार्यवाह
श्रीगुरुजी रुग्णालय
**संपादक मंडळ**
**श्री. प्रकाश भिडे**
**श्री. गजानन होडे**
**श्री. श्रीराम महाजन**
**डॉ. गिरीश बेद्रे**
**डॉ. अभिजित मुकादम**
**मोबाईल : ८३८००११२७८**
abhizone3@gmail.com

अक्षरजुळणी, सजावट व मुद्रण
**अल्टीमेट इंप्रेशन्स,**
१९, विकास कॉलनी, इंडियन आईल
पेट्रोल पंपासमोर, त्रिंबक रोड, नाशिक.
फोन : ०२५३-२३५२५३०

**द्वैवार्षिक वर्गणी रु. १००/-**
**त्रैवार्षिक वर्गणी रु. १५०/-**
**या अंकाचे देणगी मूल्य रु. १५/-**

# संपादकीय ...


प्रिय वाचक बंधुंनो...

आपला 'जिव्हाळा' सुरु होऊन तीन वर्ष पूर्ण झाली. म्हणूनच तिसऱ्या वर्षाचा शेवटचा अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. याचे सर्व श्रेय आपणा वाचकांना व हितचिंतकांना जाते.

प्रत्येक अंक हा एका विशिष्ट आजाराबद्दलची माहिती देणारा असावा अशी आपली प्रथा आहे व त्या विषयाला अनुसरूनच आपल्या अंकाचे मुखपृष्ठही असते. या अंकात आपण Rheumatoid Arthritis या प्रकारच्या सांधेदुखीबाबत जाणीव जागृती करण्याच्या दृष्टीने डॉ. अविनाश बुचे यांचा अतिशय माहितीपूर्ण असा लेख दिलेला आहे. त्याचबरोबर कॅन्सरवर करण्यात येणारे किरणोपचार याबद्दल सखोल माहिती देणारा डॉ. गिरीश बेद्रे यांचा लेखही आपणांस वाचावयास मिळेल. स्वामी विवेकानंद सार्धशतीच्या निमित्ताने संत कबीरनगर येथे करण्यात आलेल्या सर्वेक्षणासंबंधीचा अतिशय संवेदनाशील असा लेख प्रा. श्री. संजय साळवे यांनी शब्दबद्ध केला आहे. याबरोबरच आपले नेहमीचे सदर 'रुग्णानुभव', 'घडामोडी', 'पुस्तक परिचय' यांचा देखील समावेश या अंकात आहे.

मागील तीन महिन्यांमध्ये रुग्णालयात हृदयाच्या संबंधीत स्ट्रेस टेस्ट व २ डी इको या तपासण्या आपण सुरु केलेल्या आहेत. तसेच डायलिसिस विभागदेखील रुग्णांसाठी खुला करण्यात आला आहे. अर्थातच या सुविधा माफक दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत हे वेगळे सांगावयास नको. या सर्व सुविधांचा लाभ घेणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. ती आणखी वाढावी यासाठी आपण सर्व वाचकांना विनंती की आपण याची माहिती गरजूंपर्यंत पोहचवावी.

**-- रवींद्र बेडेकर**




# पुस्तक परिचय – प्रकाश भिडे

## 'मेंदूतला माणूस'

**लेखक : डॉ. आनंद जोशी व सुबोध जावडेकर**

''मेंदूतला माणूस'' नाव जरा विचित्र वाटतंय ना ? माणसाच्या साऱ्या भाव-भावना, राग-लोभ, आशा-निराशा मेंदूत उपजतात, वाढतात. हसणं-रडणं, खेळणं-बागडणं, लढाई-झगडा सारं काही मेंदूमध्येच ! मेंदू म्हणजे केवळ बुध्दी आणि प्रज्ञाच नाही तर कलाकौशल्य आणि क्रीडा नैपुण्य सुध्दा. प्रेमाची ज्योत मेंदूत तेवते. सूडाचा अंगारही इथंच पेटतो. जाणीवेचा प्रकाश, नेणीवेचा अंधार दोन्ही मेंदूच्या गाभाऱ्यात एकत्र नांदतात. माणसाचा चांगुलपणा मेंदूत जन्मतो आणि दुष्टपणा देखील. माणूस म्हणजे मेंदूच. म्हणून तर मेंदूचा शोध म्हणजे माणसाचा शोध. माणसातल्या माणूसपणाचा शोध.

''मेंदूतला माणूस'' हे नाव धारण करणाऱ्या पुस्तकाचा हा ''ब्लर्ब'' आहे. ब्लर्ब म्हणजे पुस्तकाच्या शेवटच्या पानावर लिहिलेला मजकूर. सगळ्याच पुस्तकांचे ब्लर्ब फार अर्थपूर्ण असतात असं नाही. पण तुमच्या लक्षात आलंच असेल की याचा आहे. डॉ.आनंद जोशी व सुबोध जावडेकर या लेखक द्वयानेच लिहिलेली प्रस्तावनाही तितकीच चांगली आहे. या लेखना मागचा उद्देश त्यात समजावून सांगितला आहे. पुस्तकाच्या वाचनातून मेंदूचं विज्ञान काही प्रमाणात कळतं, पण हेतू तेवढाच मर्यादित नाही.

दैनंदिन व्यवहारात आपण स्वतः व आसपासचे लोक वेगवेगळ्या पध्दतीने वागतात. त्यामुळे आपल्याला बरं वाटतं, कधी राग येतो, कधी उदास वाटतं तर कधी आश्चर्य वाटतं. काही प्रसंग अनाकलनीय वाटतात. त्यातून व्यक्ती विषयीची आपली मतं बनतात आणि नंतर आपण त्याच मतांच्या चौकटीतून त्या व्यक्तीकडे पाहतो. या पुस्तकातल्या एकेका प्रकरणातून काही व्यक्ती आणि त्यांच्या केसेस आपल्या समोर येतात. त्या वाचल्यावर आपण तात्पुरते का होईना सावध होतो. सभोवताली वावरणाऱ्या या व्यक्तींच्या वर्तणुकीचा आपण लावलेला अर्थ हा वेगळा असू शकतो का? असा प्रश्न मनात डोकावल्यावाचून राहत नाही. त्यातून माणसाकडे अधिक उदार दृष्टीने बघण्याची शक्यता निर्माण होते. व्यापक अर्थाने परस्पर संबंधातील स्वास्थ्य वृध्दिंगत होण्याची ही सुरुवात ठरू शकते आणि हाच या पुस्तकाचा मूळ आणि महत्वाचा उद्देश आहे, असं मला वाटतं.

स्वप्न, गुन्हेगारी वृत्ती, गमावलेल्या अवयवाचा आभास, रागीटपणा, असूया, स्मृती, सहानुभूती अशा विविध गोष्टी संबंधीचे चिंतन व विज्ञान यातल्या प्रकरणांतून समोर येते आणि नकळत आपण आपल्या आयुष्यातल्या घटनांशी ते ताडून पाहू लागतो, हे या पुस्तकाचे खरे यश आहे.

जाता जाता विषयातले संशोधन, संशोधक आणि चाचण्या यांचीही माहिति मिळाल्याने हे वाचन समृध्द करणारे वाटते. मेंदूच्या विज्ञानासारखा गहन

विषय कमालीच्या सोप्या व तितक्याच रंजक पध्दतीने मांडणे हे अजिबात सोपं नाही. पण ही करामत लेखकांनी करून दाखविली आहे. त्यामुळेच 3 वर्षात त्याच्या 4 आवृत्या निघाल्या आहेत. राजहंस प्रकाशनाने आगळ्या वेगळ्या विषयावरची पुस्तके वाचकांपुढे ठेवण्याची आपली परंपरा कायम ठेवली आहे.

पुस्तकाचे नाव :- मेंदूतला माणूस
लेखक - डॉ. आनंद जोशी व सुबोध जावडेकर
प्रकाशन - राजहंस, पुणे,

❖❖❖

## गत तीन महिन्यांतील देणगीदारांची नावे

| | |
|---|---|
| श्री. मधुसुदन गोखले | बेंगलूरू |
| कु. अनुश्री रमेश तैनवाला | मुंबई |
| सौ. माया सांघी | मुंबई |
| मृदुला देवस्थळे | मुंबई |
| श्रीमती फ्रेनी डी. पाडेर | मुंबई |
| श्री. मदन सांघी | मुंबई |
| श्री. मधुकर कोतवाल | मुंबई |
| श्री. नलीन एन. जैन | मुंबई |
| श्री. प्रभाकर वाय. टिकेकर | मुंबई |
| श्री. रत्नाकर हरी जोशी | मुंबई |
| श्री. सुरेश रामकृष्ण परांजपे | मुंबई |
| श्रीमती शकुंतला मनोहर बर्वे | मुंबई |
| सत्या बिल्डमार्ट प्रा. लि. | मुंबई |
| श्री. बळवंत रघुनाथ केळकर | पुणे |
| श्री. हेमंत विठ्ठल पाठक | पुणे |
| श्री. परीशील वासुदेव वाकलकर | पुणे |
| श्री. पुरुषोत्तम गणेश करंदीकर | पुणे |
| डॉ. धुंडीराज एस. कहाळेकर | कोल्हापूर |
| सौ. मृणाल टिकेकर | कोल्हापूर |
| श्री. अभय विनायक खरे | नाशिक |
| डॉ. मंदाकिनी चिटको | नाशिक |
| सौ. गौरी जयंत देशमुख | नाशिक |
| साक्षी महेश देशमुख | नाशिक |
| समर्थ डायग्नोस्टिक्स | नाशिक |
| श्री. अनंत अथनी | नाशिक |
| श्री. अरुण पुंडलिक | नाशिक |
| श्री. अश्विनीकुमार आर. भारद्वाज | नाशिक |
| श्री. दिपक रामचंद्र गायधनी | नाशिक |
| जुनागडे हेल्थकेअर प्रा. लि. | नाशिक |
| श्री. केदार वासुदेव शिंगणे | नाशिक |
| श्री. मंगेश एम. नाईक | नाशिक |
| श्री. पांडुरंग त्र्यंबक वाड | नाशिक |
| श्री. प्रभाकर एस. शिंदे | नाशिक |
| श्री. प्रसाद अशोक कुलकर्णी | नाशिक |
| श्री. संकेत हुदलीकर | नाशिक |
| श्री. श्रीपाद बुरकुले | नाशिक |
| श्री. सोमनाथ सदाशिव बुरकुले | नाशिक |
| श्री. विशाल आर. नेरकर | नाशिक |
| अमोस एंटरप्रायजेस् लि. | |
| श्रीमती नंदा गोखले | |
| श्री. अनंत बागुल | |
| श्री. जे. व्ही. आठवले | |

# Rheumatoid Arthritis

**डॉ. अविनाश बुचे**
एम.डी.

RA या लघुनामाने ओळखला जाणारा आजार म्हणजे .Rheumatoid Arthritis वास्तविक पाहता पुरातन काळापासून या आजाराची माहिती आपल्याकडे होती. आयुर्वेदात 'आमवात' म्हणून हा आजार ओळखला जातो. आधुनिक वैद्यकशास्त्र जे 100 - 125 वर्ष जुने आहे त्यामध्ये देखील फार पूर्वीपासून या आजाराची माहिती होती. मात्र प्रभावी अशी औषधे 1985 - 90 साला पासून मुबलकरित्या उपलब्ध होऊ लागली व त्यामुळे संशोधनकर्ते व डॉक्टरांचा उत्साह वाढू लागला. या आजारासंबंधी आपण अधिक जाणून घेऊ या.

**RA होण्याची कारणे कोणती ? व RA हा आजार कसा होतो ?**

खरे सांगायचे झाले तर एक निश्चित कारण सांगता येत नाही. काही बाह्य कारणे (Environmental Factors ) व काही अंतर्गत कारणे (Genetic factors) या दोहोंचा मिलाफ झाल्यामुळे हा आजार होतो. Environmental factors मध्ये मुख्यत्वे काही Virus किंवा Bacteria यांचा संसर्ग गृहीत धरला जातो. एक लक्षात घेतले पाहिजे की याचा Direct संबंध नाही, म्हणजे अमक्या Virus ने संसर्ग झाल्यास RA होईल असे नाही. शरीरात होणारे इतर Infection या आजाराला निमंत्रण देऊ शकतात. मात्र त्याकरिता अंतर्गत कारणे (Genetic factors) ही अतिशय महत्वाची असतात.

Chromosome 6 वरील काही HLA नावाची Genes या साठी कारणीभूत असतात. ह्या Genes मध्ये बिघाड झालेल्या व्यक्तींना जर काही विशिष्ट Infection झाले तर autoimmunity ची प्रक्रिया सुरु होऊन आजारास सुरुवात होते.

ही autoimmunity नावाची भानगड थोडक्यात जाणून घेऊ. आपल्या शरीरात बाह्यजंतू व बाह्य घटकांपासून संरक्षणासाठी रोगप्रतिकारक शक्ती असते (Immune System). रक्तातील पांढऱ्या पेशी व Lymphnode, Spleen या सारखे काही अवयव हे काम करतात. मात्र काही कारणाने रक्तातील पेशी आपल्याच शरीरातील पेशींविरुध्द काम करायला लागल्या तर आजार निर्माण होतो. यालाच autoimmune disease असे म्हणतात. या पेशी अशा विचित्रपणे वागण्यासाठी कदाचित बाह्य व अंतर्गत कारणे एकत्र आल्यामुळे उद्युक्त होत असाव्यात. अशा (autonomous) अराजक पेशी मग सांध्यांवरील आवरण (synovium) खराब करतात व त्यामुळे RA होतो.

संधीवात या आजाराचे अनेक प्रकार Modern Medicine मध्ये सांगितले आहेत. RA हा त्यातील एक प्रकार. वर सांगितल्याप्रमाणे ह्या सर्व संधीवाताचे कारण autoimmunity किंवा Immune system मधील बिघाड ही आहेत. याला अपवाद आहे Osteoarthritis (OA). या आजाराच्या नावात जरी arthritis असला तरी या आजाराची कारणे

व उपचार वेगळे आहेत व म्हणूनच RA व OA यामध्ये डॉक्टरांना फरक करणे अतिशय आवश्यक असते.

RA हा आजार पुरुषांपेक्षा स्त्रियांना जास्त होतो. M:F ratio 3-4:1 असा आहे. वय वर्षे 30 - 60 या वयात हा आजार होतो. मात्र इतरांनाही तो होऊ शकतो.

**RA या आजाराची लक्षणे कोणती ?**

1) शरीरातील हाताची व पायाच्या बोटांची लहान व मोठी सर्व सांधे सुजणे आणि त्यामध्ये तीव्र वेदना होणे.

2) सकाळी उठल्यावर वा आराम केल्यानंतर सांधे तासभराहून अधिक वेळ आखडणे, हे आखडणे कधी कधी दिवसभरही राहू शकते.

3) अशक्तपणा, बारीक ताप येणे, भूक मंदावणे किंवा आजारी असल्याची भावना होणे.

4) तोंड व डोळे कोरडे पडणे.

ही या आजाराची प्रमुख लक्षणे आहेत. यामधील 1,2 ही लक्षणे असतील तरच संधीवात असण्याची अशी शक्यता असते.

मात्र RA हा केवळ सांध्यांचा आजार नाही तर तो संपूर्ण शरीराचा आजार आहे. वरील लक्षणांव्यतिरिक्त कुठल्या अवयवात आजार पसरला आहे, त्यानुसार इतर लक्षणे दिसतात.उदा. :-

5) मानेच्या मणक्यांचा आजार - असे असल्यास पाठीमागील डोके दुखणे, मान दुखणे किंवा मज्जारज्जुला धक्का लागून Paralysis होणे इत्यादि प्रकार दिसतात.

6) फुफ्फुस :- फुफ्फुसांचा जर आजार असेल तर छातीत पाणी होणे, दम लागणे, खोकला होणे इत्यादि लक्षणे दिसतात.

7) Peripheral nerves :- Peripheral nerves चा आजार झाल्यास पायातील संवेदना कमी होणे, वारंवार पायावर न भरणाऱ्या जखमा होणे इत्यादि लक्षणे दिसतात.

8) हृदय :- RA च्या रुग्णांना हृदयाचा आजार होण्याचे प्रमाण जास्त असते. त्यामध्ये Ischemic heart disease हा सर्वात महत्वाचा आहे. हृदयासंबंधी लक्षणे RA पेशंट मध्ये असल्यास त्वरीत डॉक्टरांशी संपर्क साधणे गरजेचे असते. जेणे करून पुढे येणाऱ्या हार्ट अ‍ॅटॅकपासून पेशंटला वाचवता येऊ शकते.

9) Osteoporosis - हाडे ठिसूळ होणे RA च्या रुग्णांना osteoporosis लवकर होतो.

10) डोळ्यांचे आजार Scleritis, episcleritis या सारखे डोळ्यांचे आजारही RA च्या रुग्णांमध्ये आढळतात.

11) याशिवाय RA with vasculitis (रक्तवाहिन्यांवरील सूज) तसेच औषधांचे होणारे साईड इफेक्ट्स यांचीही लक्षणे दिसतात. (उदा.: - किडनीचे काम कमी होणे, मोतीबिंदू किंवा काचबिंदू होणे, लिव्हरवर सूज येणे इत्यादि)

12) RA च्या रुग्ण असलेल्या स्त्रिया गरोदर झाल्यास RA चा त्रास कमी होतो. मात्र बाळंतपणानंतर आजार उफाळून येतो. RA चा प्रभाव जास्त असतांना गरोदर झाल्यास पोटातील बाळाच्या वाढीवर त्याचा परिणाम होतो.

**RA या आजाराचे निदान कसे होते ?**

मुख्यतः RA च्या आजाराचे निदान रुग्णाची लक्षणे पाहून होते. रक्त चाचण्या या सहाय्यभूत (Supportive) असतात. हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. केवळ Rheumatoid factor पॉझिटिव्ह असल्यास (व तशी निश्चित लक्षणे नसल्यास) RA चे निदान होत नाही. त्यामुळे पेशंटने केवळ चाचणी Positive आहे म्हणून RA आहे असे म्हणणे योग्य नाही. काही वेळेला X-Ray व इतर रक्त लघवीच्या चाचण्या उपयोगी असतात व त्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार करणे योग्य ठरते.

तसेच जशी लक्षणे असतील त्याप्रमाणे इतर अवयवांमध्ये आजार आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी देखील काही चाचण्या कराव्या लागतात. (उदा.:- फुफ्फुसांच्या C.T. Scan इ.)

**RA या आजारावर कोणता औषधोपचार उपलब्ध आहे ?**

Modern medicine मध्ये RA वर प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. RA या आजारावर उपचार करतांना बऱ्याच गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. जसे आजार किती वर्षे जुना आहे ? काही व्यंग आहेत का ? इतर कुठल्या अवयवांचा आजार आहे का ? रुग्णाला RA शिवाय इतर काही आजार आहेत का ? इत्यादि.

बऱ्याच वेळेस केवळ Steroid देतात हो, अशी भावना रुग्णांमध्ये असते. Steroid चा वापर हा केवळ काही दिवसांपुरता केला जातो. DMARDs (Disease modifying anti Rheumatic drugs) हे RA च्या उपचारांमध्ये मध्यवर्ती व मुख्य असतात. मात्र ती डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेणे योग्य नाही. वेळोवेळी रक्ताच्या चाचण्या करून त्यांचे Side effects बघता येतात व त्याप्रमाणे उपाय योजना करता येते.

याव्यतिरिक्त ज्या रुग्णांचा आजार खूप वर्षांपासून आहे त्या रुग्णांच्या पुनर्वसनासाठी Physiotheropy व occupational therapy चा फार मोठा वाटा असतो. या उपचारांमुळे रुग्णाचे दैनंदिन आयुष्य हे सुकर होते.

RA चा उपचार हा दीर्घकाळ चालणारा आहे. काही औषधे ही कायम स्वरुपी असतात. लक्षणे दिसू लागताच जर प्रभावी औषधे सुरु केली तर पुढे येणाऱ्या Deformities टाळता येतात. RA हा आजार समूळ नष्ट करण्याचे उपचार अजून उपलब्ध नाहीत. त्यामुळे नियमित औषधोपचार व व्यायाम करणे हे अतिशय गरजेचे आहे. Deformities झाल्यावर त्या ठीक करणे नेहमीच शक्य होते असे नाही. त्यामुळे वेळीच खबरदारी घेणे हेच इष्ट नाही का

*लेखक डॉ. अविनाश बुचे हे ह्रमॅटॉलॉजिस्ट असून औरंगाबाद येथील डॉ. हेडगेवार रूग्णालयात पूर्णवेळ सेवा देतात. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी ते श्रीगुरुजी रुग्णालयात 10 ते 2 या वेळेत उपलब्ध असतात. त्यांचा सल्ला हवा असल्यास कृपया अपॉइंटमेंट घेऊन यावे.*

*(0253) 2343401/8380011286*

❖❖❖

---

# भावपूर्ण श्रद्धांजली

❖ रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व श्रीगुरुजी रुग्णालयाचे देणगीदार **श्री. भालचंद्र वावीकर** यांचे दि. 28 डिसेंबर, 2013 रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांची शेवटची इच्छा म्हणून त्यांच्या मुलींनी व नातेवाईकांनी रुग्णांसाठी ब्लँकेटस् देणगी स्वरूपात दिले आहेत.

ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्‌गती देवो ही प्रार्थना !!!

❖ श्रीगुरुजी रुग्णालयाचे हितचिंतक व सक्रिय कार्यकर्ते श्री. संजय जाखडी यांच्या मातोश्री **सौ. अनुराधा जाखडी** यांचे 16 जानेवारी, 2014 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.

ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्‌गती देवो ही प्रार्थना !!!

❖ श्रीगुरुजी रुग्णालयाचे देणगीदार **श्री. विठ्ठल चिटणीस** यांना वृद्धापकाळाने दि. 18 जानेवारी 2014 रोजी देवाज्ञा झाली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !!

# संत कबीरनगर : समाजाचे वास्तव दर्शनातून एक आत्मचिंतन

स्वामी विवेकानंद सार्धशतीच्या निमित्ताने सेवा साधना कालावधीत सेवा वस्तीतील काम किमान एक पाऊल पुढे जाण्याच्या उद्दिष्टाने संत कबीरनगर मध्ये श्रीगुरुजी रुग्णालयाचे सेवाव्रती आणि कार्यकर्ते ह्यांच्या संपर्कातून 682 पेक्षा अधिक घरातून प्राथमिक आरोग्य सोयी सुविधा विषयी सर्वेक्षण करण्यात आले. एका अर्थाने सामाजिकदृष्ट्या वंचित असलेल्या घटकाची सद्यस्थिती ह्या निमित्ताने समजून घेण्यात आली. आत्मपरिक्षण आणि प्रशिक्षण म्हणून आम्हा सर्व सहभागी सेवाव्रती आणि कार्यकर्त्यांचा अनुभव या सर्वेक्षणाच्या निमित्ताने खूप चांगला राहिला आहे. समरसता आंदोलनाच्या कामाच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत अनेक ज्ञात अज्ञात कार्यकर्त्यांनी खरं तर कृतीतून समरसतेचा मार्ग प्रशस्त केला आहे. त्याच प्रेरणेमुळे सेवा वस्तीतील संपर्क अनेक अर्थांनी विचार करायला लावणारा ठरला.

संत कबीरनगर मधील शिक्षणाविषयी असलेली तळमळ आम्हा सगळ्यांना आशेचा किरण वाटली. या सर्वेक्षणात आमच्याबरोबर वस्तीत राहणारे भोसला मिलिटरी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, इंजिनिअरिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी अशांचा सलग 15 दिवस उत्तम सहभाग होता. सामाजिक परिवर्तनात जोडल्या गेलेल्या विविध प्रकल्पात स्थानिकांचा सहभाग अतिशय महत्त्वपूर्ण असतो. त्या दृष्टीने ही एक जमेची बाजू ठरली. समरसता हे कृतीरूप तत्व आहे. म्हणून सेवाव्रती आणि कार्यकर्त्यांनी अगदी घराघरात संपर्क केला.

श्रीगुरुजी नेहमी म्हणत, ''मी नाही तूच''. याला एक गहन असा आध्यात्मिक अर्थ आहे. त्यातील अनेक अर्थांचा एक अर्थ आहे, ''मी तुझ्यातून उत्पन्न झालो आहे. म्हणून माझे असे काही नाही. जे काही आहे ते तुझेच आहे.'' गुरुजी मनात म्हणत की, समाज हा परमेश्वराचे विशाल रूप आहे. एकाच चैतन्याचे आपण विविधांगी रूपं आहोत. म्हणूनच ज्या गोष्टींमुळे मला सुखदुःख होते. ते समजून 'आत्मवत सर्वभूतेषु' या सद्भावनेने दुसऱ्यांशी समरस झाले पाहिजे. याच मनोभावाने सेवाव्रतींनी आत्मीयतेने आणि आपलेपणाने संपर्क केला. हे करताना आपण काही विशेष करत आहोत अशी कुठलीही भावना मनात न ठेवता सहजतेने सर्वेक्षणानंतरचे आरोग्य शिबीरही पार पडले. यात लहान मुलं आणि महिला असे मिळून 200 च्या आसपास जणांची मोफत तपासणी श्रीगुरुजी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी केली. ह्या निमित्ताने तेथील विद्यार्थ्यांच्या घराघरातील असलेलं संपर्काचं नातं आणि आत्मीयता अनुभवायला मिळाली.

सेवावस्तीतील 'आहे रे-नाही रे' मधील तफावत, अंधश्रद्धा, राजकीय वातावरण, शासनाचा दृष्टीकोन आणि धोरणे अशा अगणित समस्यांचा संघर्ष ह्या निमित्ताने समोर आला. समाजाचे वास्तव दर्शन घडवणाऱ्या या सर्वेक्षणामुळे मनात एक अस्वस्थता निर्माण केली. आपल्या समाजस्थिती बद्दल आत्मचिंतन करण्याची प्रेरणा मिळाली. पण दुसऱ्या बाजुला परिवर्तनासाठी अनेक हात आपल्या सगळ्यांच्या बरोबर आहेत याचाही अनुभव आला. स्वामी विवेकानंदांच्या विचारातील ''शिवभावे जीवसेवा'' लक्षात ठेऊन सेवाव्रतींच्या आणि कार्यकर्त्यांच्या अनुभवांना समजून घेऊन या कामात अधिक गती आगामी काळात येईलच. कधी कधी शरीरावर घाव बसतात, ते जखमी होते, जखमेवर खपली धरते, शरीर आपल्यातील जीवनरसाने जखमा भरून टाकते. त्यासाठी चांगला आहार आवश्यक असतो आणि काही पथ्ये पाळावी लागतात. समाजरूपी शरीरावरही असे काही घाव लागलेले आहेत. समाजानेही आपल्या आंतरिक शक्तींच्या माध्यमातून ते घाव भरून काढायला हवेत. या शक्तीला जागविण्याचे व सशक्त बनविण्याचे कार्य श्रीगुरुजींच्या युगानुकूल विचार उर्जेने चालविले आहे. याच विचार उर्जेतील प्रयत्नाचा हा एक भाग आहे.

**प्रा. संजय साळवे.**
**सहाय्यक प्राध्यापक**
**डॉ. मुंजे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड कॉम्प्युटर स्टडीज, नाशिक.**

# कॅन्सर किरणोपचार

**डॉ. गिरीश बेद्रे**
**एम.डी., डी.एन.बी.**
**मो.: ८३८००११२७३**

कॅन्सर किंवा कर्करोगावर उपचार करण्यासाठी काही विशिष्ट किरणांचा वापर केला जातो त्याला 'किरणोपचार' असे म्हणतात. परंतु त्या आधी आपल्याला कॅन्सर म्हणजे काय हे जाणून घेणे आवश्यक आहे.

आपले शरीर हे असंख्य पेशींनी बनलेले आहे. प्रत्येक प्रकारच्या पेशींची एक वयोमर्यादा ठरलेली असते. जुन्या पेशी मृत पावतात व नव्या पेशी तयार होतात. हे चक्र अव्याहतपणे चालू राहते त्यामुळे पेशींची संख्या नियंत्रित राहते. परंतु या चक्रात काही कारणांमुळे बिघाड झाल्यास पेशींची संख्या वाढायला सुरुवात होते व तेथे गाठ तयार होते. **अर्थात पेशींची अनियमित व अनिबंध वाढ म्हणजेच कॅन्सर होय.**

कॅन्सरवर प्रामुख्याने तीन प्रकारचे उपचार उपलब्ध आहेत.

१) शस्त्रक्रिया,

२) किमोथेरपी,

३) किरणोपचार किंवा रेडिएशन.

या लेखात आपण किरणोपचाराबद्दल अधिक माहिती घेणार आहोत. काही विशिष्ट प्रकारच्या किरणांचा कॅन्सर पेशींवर मारा करून त्या पेशींचा नायनाट करणे हा या उपचारपद्धतीचा मूळ सिद्धांत आहे. हे विशिष्ट प्रकारचे किरण म्हणजे दुसरे-तिसरे काहीही नसून ते क्ष-किरण (एक्स रे) अथवा गॅमा किरण आहेत. परंतु उपचारामध्ये वापरण्यात येणाऱ्या या किरणांची क्षमता (High energy) खूप जास्त असते जेणेकरून कॅन्सरच्या पेशी मरतील.

**किरणोपचाराचे प्रकार**

१) **टेलीथेरपी** - शरीराच्या ज्या भागाला कॅन्सर झाला आहे त्या भागावर एका विशिष्ट अंतरावरून किरणांचा मारा करणे. यासाठी दोन प्रकारची उपकरणे उपलब्ध आहेत.

अ) **टेली कोबॉल्ट मशीन** - या मशीनमध्ये गॅमा किरण बाहेर फेकणारा कोबॉल्ट नावाचा किरणोत्सारी पदार्थ असतो व या किरणांच्या सहाय्याने कॅन्सरचा उपचार केला जातो.

ब) **लिनियर ॲक्सलरेटर** - या मशीनमध्ये High energy 'क्ष' किरण निर्माण केले जातात व त्यांच्या सहाय्याने कॅन्सरचा उपचार केला जातो.

२) **ब्रेकीथेरपी ( जवळून रेडिएशन देणे ) -** ज्या अवयवाला कॅन्सर झालेला आहे त्या ठिकाणी विशिष्ट प्रकारच्या सुया घुसविल्या जातात व त्या सुयांतून एका मशिनद्वारे रेडिएशन दिले जाते.

यासाठी 'सिजियम' व 'इरिडियम' याप्रकारचे किरणोत्सारी पदार्थ वापरले जातात.

किरणोपचार थेरपीचा मूळ उद्देश असतो की जास्तीत जास्त रेडिएशन कॅन्सर पेशींना दिले जावे व

आजूबाजूच्या सामान्य पेशींना कमीत कमी रेडिएशन मिळावे. म्हणजेच सामान्य पेशींना इजा कमीत कमी व्हावी व रेडिएशनमुळे होणारे दुष्परिणाम कमी व्हावेत.

**रेडिएशन कसे दिले जाते ?**

**टेलीथेरपी**

- सर्वप्रथम रुग्णाला रेडिएशन म्हणजे काय व ते कसे दिले जाईल याची संपूर्ण कल्पना दिली जाते.

- त्यानंतर कॅन्सर कोणत्या अवयवाला झाला आहे त्यानुसार तो भाग/अवयव रेडिएशनच्या वेळी स्थिर रहावा अथवा हलू नये यासाठी रुग्णाला विशिष्ट प्रकारच्या पोझिशनमध्ये झोपविले जाते. त्या भागाचे एक विशिष्ट प्रकारचे Mask बनविले जाते जेणेकरून तो भाग हलणार नाही.

- त्यानंतर आवश्यकतेप्रमाणे रुग्णाचे सी.टी.स्कॅन केले जाते.

- हे सी.टी.स्कॅन एका स्पेशल संगणकाकडे पाठविले जाते (Treatment planning system). त्या संगणकाच्या सहाय्याने सी. टी. स्कॅनवर कॅन्सरचा भाग व सामान्य अवयव यांचे marking केले जाते व त्यानंतर त्या कॅन्सरला कोणकोणत्या कोनातून (Angles) रेडिएशनचा मारा करता येईल ते ठरविले जाते व planning पूर्ण झाल्यानंतर रुग्णाला त्याप्रकारे उपचार दिले जातात.

रेडिएशन देत असताना रुग्णाला रेडिएशन रूममध्ये मशीनखाली झोपविले जाते. रुग्णाजवळ दुसरे कोणीही उभे राहू शकत नाही. उपचार करणारे तंत्रज्ञ रुमच्या बाहेरून संगणकाच्या मदतीने मशीनचे संचालन करतात. रेडिएशनची मात्रा किती द्यायची आहे व किती कोनातून द्यायची आहे या व अशा इतर बाबींवर रेडिएशन किती वेळ द्यायचे आहे हे ठरते. साधारणपणे 2 ते 20 मि. इतका वेळ लागू शकतो.

रेडिएशनचा उपचार कॅन्सरचा पूर्णपणे नायनाट करण्यासाठी (Radical) दिला गेल्यास त्याची मात्रा दररोज 1 याप्रमाणे आठवड्यातून 5 दिवस (कधी कधी सहा दिवस) असे 4 ते 7 आठवड्यापर्यंत दिली जाते (20 ते 35 रेडिएशन्स).

रेडिएशनचा उपचार जर palliative कारणांसाठी म्हणजेच शरीरात सर्वत्र पसरलेल्या कॅन्सरमुळे निर्माण झालेली लक्षणे कमी करण्यासाठी दिला गेल्यास साधारणपणे त्याची मात्रा कमीत कमी 1 ते 10 रेडिएशन्स एवढी असते.

किरणोपचाराचा मूळ उद्देश साध्य करण्यासाठी मागील दोन दशकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे संशोधन झाले आहे व या कामी बऱ्याच अंशी यश आले आहे. त्याला आम्ही High precision Techniques असे म्हणतो. या सर्व प्रकारच्या Techniques आपल्याला Linear Accelerator मशीनमध्ये उपलब्ध आहेत परंतु टेलीकोबॉल्टमध्ये उपलब्ध नाहीत.

**High Precision Techniques**

a) 3DCRT - (3 Dimensional conformal Radiation Therapy)
b) IMRT - (Intensity modulated Radiation Therapy)
c) IGRT - (Image Guided Radiation Therapy)
d) VMAT - (Volumetric modulated Arc Therapy)
e) SRS/SRT - Stereotactic Radiotherapy. SBRT

या सर्व गोष्टी आज उपलब्ध असलेल्या उच्च दर्जाच्या संगणकामुळे शक्य झालेल्या आहेत.

**किरणोपचारामुळे होणारे संभाव्य दुष्परिणाम**

- किरणोपचारामुळे होणारे दुष्परिणाम हे ज्या भागाला रेडिएशन दिले जाते त्या भागापुरतेच मर्यादित असतात.

संपूर्ण शरीराला त्याचे दुष्परिणाम शक्यतो संभवत नाहीत. जसे -

- त्वचा काळी होणे, त्वचेचा पापुद्रा निघणे, जखम होणे.
- त्या भागाचे केस जाणे.
- अवयवाच्या आतील अस्तराला इजा पोहोचणे.

उदा. जर तोंडाच्या वा मानेच्या भागात किरणोपचार दिला असेल तर तोंडामध्ये व घशामध्ये आतील अस्तराला इजा पोहोचते म्हणून गिळायला त्रास होतो.

- जुलाब होणे, उलटी व मळमळ होणे - जर पोटाच्या भागाला (जिथे छोटे व मोठे आतडे असतात) रेडिएशन दिले जात असल्यास हे दुष्परिणाम संभवतात.
- लघवीला आग होणे/लघवीतून रक्त पडणे - ओटीपोटाच्या भागात जेथे मुत्राशय असते त्या भागाला रेडिएशन दिले जात असल्यास.
- खोकला, श्वसनाला त्रास होणे - जर छातीच्या भागाला रेडिएशन दिले गेले असल्यास.
- सामान्य दुष्परिणाम - भूक मंदावणे, अशक्तपणा वाटणे इ.

यातील बरेचसे दुष्परिणाम हे तात्पुरत्या स्वरूपाचे असतात व साधारणपणे उपचार संपल्यानंतर दीड ते दोन महिन्यात नाहीसे होतात.

- त्याबरोबर काही दूरगामी दुष्परिणाम देखील संभवू शकतात. त्याबद्दल इथे विस्ताराने देणे आवश्यक वाटत नाही.

**किरणोपचार कोणत्या रूग्णांसाठी उपयुक्त आहे.**

साधारणपणे 70% कॅन्सर रुग्णांना रेडिएशनची आवश्यकता असते. रेडिएशन हे ऑपरेशनपूर्वी किंवा ऑपरेशननंतर दिले जाऊ शकते. तसेच किमोथेरपी सोबत अथवा त्यानंतर वा अगोदरही दिले जाऊ शकते. यासंबंधी आपले कॅन्सरचे तज्ज्ञ अधिक मार्गदर्शन करू शकतील.

**किरणोपचाराबद्दल असलेले काही गैरसमज -**

* **किरणोपचार म्हणजे लाईट, शॉक, चटका इ. -** किरणोपचार घेताना रुग्णाला कोणत्याही प्रकारची जाणीव होत नाही; चटका किंवा शॉक लागत नाही.

* **केस गळतात** - ज्या भागावर उपचार सुरु आहे फक्त त्याच भागाचे केस नाहीसे होतात. इतर भागातील केसांवर काहीही दुष्परिणाम होत नाही. गेलेले केस कालांतराने पुन्हा येतात.

* **किरणोपचारामुळे रुग्णाचे खूपच हाल होतात -** हे काही खरे नाही. आज उपलब्ध असलेल्या High precision Techniques मुळे रेडिएशनमुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यात मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे रुग्णाचे हाल होतात हे काही तितकेसे बरोबर नाही.

**श्रीगुरुजी रुग्णालयात सुरु होणारी सुविधा -**

आपल्या रुग्णालयात अद्ययावत अशा प्रकारचे लिनियर ॲक्सलरेटर मशीन लवकरच येत आहे. हे मशीन वर नमूद केलेल्या सर्व प्रकारच्या High precision Techniques चा उपचार करू शकेल असे आहे. तसेच अद्ययावत असे ब्रेकीथेरपी मशीनही रुग्णालयात उपलब्ध असणार आहे. अशा प्रकारची अद्ययावत मशीनरी असलेले हे नाशिकमधील एकमेव रुग्णालय असेल. मुंबई पुण्यासारख्या शहरातील इतर कोणत्याही मोठ्या रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेली सुविधा आपल्या रुग्णालयात येणार आहे त्यामुळे रुग्णांना इतरत्र जाण्याची गरज राहणार नाही. आणि अर्थातच हे उपचारसुद्धा तुलनेने अतिशय कमी दरात उपलब्ध होणार आहेत. सर्व कॅन्सर रूग्णांनी या सुविधेचा उपयोग करावा हे आवाहन.

❖❖❖

# रुग्णानुभव !

## नाते आपुलकीचे, जिव्हाळ्याचे !!!

"रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा" ह्या व्रताची उपासना करीत "श्रीगुरुजी रुग्णालयाचे" काम अव्याहतपणे सुरू आहे हे आपण जाणतोच. ह्या रुग्णालयातून बरे होऊन जाणारे रुग्ण येथील आपुलकीची वागणूक बघून भारावून जातात. रुग्णालयाबद्दल वाटणारी आस्था, आदर शब्दात व्यक्त करीत आहेत श्री. सुधाकर मुंडले.

श्री. मुंडले ह्यांच्या गाडीला अपघात झाल्याने त्यांना जखमी अवस्थेत जवळच्याच दवाखान्यात ॲडमिट केले गेले. पण शुद्धीवर येताच त्यांची मला "श्रीगुरुजी रुग्णालयात" घेऊन चला असा आग्रह धरला. (कारण मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी ते अगोदर येथे उपचार घेऊन गेले होते) त्यांच्या मुलांनी त्यांना रुग्णालयात आणले. येथील अनुभव ते स्वतःच सांगत आहेत.......

"मी १३ दिवस ह्या रुग्णालयात ॲडमिट होतो. पैकी २४ तासच आय.सी.यू. मध्ये होतो. हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. (कारण रुग्णालयात रुग्णाचे आय.सी.यू. मधले वास्तव्य फायदेशीर असते) येथील डॉक्टर, नर्स, सर्व स्टाफ, इतर कर्मचारी सर्वजण हसतमुखाने आपापली जबाबदारी वेळेचे बंधन लक्षात ठेवून व्यवस्थित पार पाडत आहेत. येथे प्रशस्त पार्किंग व्यवस्था आहे. प्रवेशद्वाराजवळच स्वागत कक्ष आहे. तेथील "सेवाव्रती" तुमचे पूर्ण समाधान होईपर्यंत न कंटाळता संपूर्ण माहिती देत असतात.

खरं तर प्रत्येक रुग्णाला लवकर घरी जाण्याची घाई असते. ते व त्यांचे नातेवाईक सतत डॉक्टरांना घरी जाण्यासाठी परवानगी मागत असतात. पण ह्या रुग्णालयात मात्र डॉक्टरांना रुग्ण बरा झाल्याची खात्री पटताच लगेचच त्याला डिस्चार्ज देतात.

येथील स्वागत कक्षातील दोन सूचना आपलं लक्ष वेधून घेतात.

1. कोणत्याही कर्मचाऱ्यास टीप देऊ नका.
2. कृपया वाढीव बिलाची मागणी करू नये.

श्री. मुंडले यांचेसारखे अनेकांचे रुग्णालयाशी आपुलकीचे नाते जडले आहे. कारण येथील सर्व डॉक्टर त्यांच्या विषयात विशेष प्राविण्य मिळवलेले असूनही बाहेर खाजगी प्रॅक्टीसच्या प्रलोभनाला बळी न पडता येथे सेवाभावी वृत्तीने कार्यरत आहेत. सर्व डॉक्टर, नर्स, इतर कर्मचारी यांचे रुग्णाशी असणारे आपुलकीचे, प्रेमाचे नाते, येथील घरासारखे वातावरण, कामातील कर्तव्यनिष्ठता बघून रुग्णांचे "श्रीगुरुजी रुग्णालयाशी" घट्ट नाते जोडले जाते. असे सेवाभावी "श्रीगुरुजी रुग्णालय" आपल्या नाशिक नगरीत आहे हे नाशिककरांना नक्कीच अभिमानास्पद आहे.

**शब्दांकन**
- सौ. वृषाली विलास पांचाल
9420484892

❖❖❖

# घडामोडी

१) दि. ३ नोव्हेंबर रोजी श्रीगुरुजी रुग्णालयात दीपोत्सव साजरा करण्यात आला. सायंकाळी ७ वाजता श्री. प्रकाशजी भिडे व सौ. शोभनाताई भिडे यांचे शुभहस्ते धन्वंतरी पूजन व लक्ष्मीपूजन करण्यात आले. याप्रसंगी रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स व कर्मचारी उपस्थित होते.

२) दि. १० नोव्हेंबर रोजी श्रीगुरुजी रुग्णालयात आरोग्य तपासणी शिबीर (दमा/ब्राँकायटीस) घेण्यात आले. डॉ. सौ. रेवती चिटको व डॉ. हर्षल पिळोदेकर यांनी एकूण ४७ रुग्णांची तपासणी केली.

३) दि. १२ नोव्हेंबर रोजी श्रीगुरुजी रुग्णालयात चष्माघराचे (ऑप्टीकल शॉप) उद्घाटन श्री. व सौ. संजीव आडगावकर यांचे शुभहस्ते करण्यात आले. त्यामुळे वाजवी दरात चष्मा मिळण्याची सोय झाली आहे.

४) दि. १८ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत श्रीगुरुजी रुग्णालयात शारदीय विरेचन शिबीर संपन्न झाले. या शिबीरात रुग्णांना औषधसिद्ध तूप देऊन नंतर दोन दिवस स्नेहन, स्वेदन करून आयुर्वेदीय औषधे देण्यात आली. वैद्या सौ. सोनाली देशमुख, वैद्या. सौ. अश्विनी चाकुरकर आणि वैद्या सौ. गायत्री बेद्रे यांनी रुग्णांची चिकित्सा केली. एकूण ३९ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

५) दि. २० नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत संत कबीर नगर या भोसलाच्या परिसरातील सेवावस्तीत स्वामी विवेकानंद सार्धशती निमित्त आरोग्य, शिक्षण, सामाजिक समस्या याविषयी सर्वेक्षण करण्यात आले. एकूण ६८० कुटुंबियांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाच्या कार्यात श्रीगुरुजी रुग्णालयाचे सेवाव्रती स्वामी विवेकानंद सार्धशती समितीचे विस्तारक, रा. स्व. संघ गोदावरी प्रभात शाखेचे स्वयंसेवक आणि संत कबीरनगर मधील डॉ. कांबळे व विद्यार्थी अशा ३० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. तसेच डॉ. विक्रांत मुंगी व श्री. रविजी बेडेकर यांचे मार्गदर्शन लागले.

६) दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रुग्णालयात श्रद्धांजलीचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी वनवासी कल्याण आश्रमाचे प्रांत संघटन मंत्री श्री. संजयजी कुलकर्णी हे प्रमुख वक्ते होते. रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स, समिती सदस्य, कर्मचारी व रुग्णांचे नातेवाईक याप्रसंगी उपस्थित होते.

७) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ८ डिसेंबर रोजी संत कबीर नगर येथील समाज मंदिरात मोफत बालरोग तपासणी व स्त्रीरोग तपासणी शिबीर घेण्यात आले. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुप्रिया देवरे व बालरोग तज्ज्ञ डॉ. नितीन बिर्ला यांनी 92 स्त्रीरुग्णांची व 102 बालरोग्यांची तपासणी केली. या शिबीरासाठी श्री. नितीन उघडे, श्री. पाडेकर व विद्यार्थी महादेव गवई यांचे सहकार्य लाभले. तसेच श्रीगुरुजी रुग्णालयाचे सेवाव्रती व संघ स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

**विशेष उल्लेखनीय -** साप्ताहिक विवेकने प्रकाशित केलेल्या दिपावली विशेषांकात (८ नोव्हेंबर, २०१३) 'मानवतेची अभंग लेणी' हा सौ. अश्विनी मयेकर यांचा विशेष लेख प्रकाशित झाला आहे. २५ वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब वैद्यकीय प्रतिष्ठानने औरंगाबाद येथे डॉ. हेडगेवार रुग्णालय उभारून रुग्णसेवेला प्रारंभ केला. रुग्णसेवा ही समाजपुरुषाची सेवा करण्याचं साधन मानून अनेक डॉक्टर्स आणि सेवाभावी तरुणांनी यात सक्रिय सहभाग घेतला. औरंगाबादच्या या सेवा प्रकल्पापासून प्रेरणा घेऊन ६ वर्षांपूर्वी नाशिक येथे श्रीगुरुजी रुग्णालय सुरु झाले. या दोन्ही सेवाकार्याच्या आणि ध्येयपूर्तीच्या यशोगाथेचं वर्णन 'मानवतेची अभंग लेणी' या लेखात करण्यात आलेलं आहे.

# श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक - हेल्थ चेकअप पॅकेजेस्

## Fast Lab (Basic - Health Check up) Rs. 400/-

1) CBC
2) BSL - F
3) Urine Routine
4) Serum Cholesterol level
5) Serum Triglyceride
6) Serum HDL
7) Blood Pressure Measurement.

## Whole Body Checkup : Rs. 1400/-

a) Complete blood count
b) ESR
c) Blood Sugar Level (Fasting)
d) Urine Routine
e) Stool routine
f) Proteins
g) Blood Urea
h) Serum Creatinine
i) Lipid Profile
j) Serum Billirubin
k) X-ray Chest
l) ECG
m) Ultrasonography abdomen
n) Eye Check up - Free
o) Physician Check up

## Package for Hypertensive Patient Rs. 1900/-

| | |
|---|---|
| a) Complete blood count | 4 times in a year |
| b) ECG | 4 times in a year |
| c) Blood Sugar Level (Fasting) | Once |
| d) Blood Sugar Level (Postmeal) | Once |
| e) Lipid Profile | 2 times in a year |
| f) Serum Creatinine | 2 times in a year |
| g) Urine Routine | 2 times in a year |
| h) Physician's advice | 4 times in a year |
| i) Eye Check up - Free | |

## Package for Diabetic Patients : Rs. 2300/-

| | |
|---|---|
| a) Blood Sugar Level (Fasting) | 5 times in a year |
| b) Blood Sugar Level (Postmeal) | 5 times in a year |
| c) Complete blood count | 2 times in a year |
| d) ECG | Once |
| e) Serum Creatinine | 2 times in a year |
| f) Blood Urea | 2 times in a year |
| g) Urine Routine | Once |
| h) Urine Microalbumin | 2 times in a year |
| i) Glycosylated haemoglobin | 2 times in a year |
| j) Lipid Profile | Once |
| k) Physician's advice | 5 times in a year |
| l) Eye Check up - Free | |

## सूचना :-

- एकदा भरलेले पैसे कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.
- पॅकेजमध्ये नमूद केलेल्या तपासण्यांखेरीज अन्य कोणत्याही तपासण्यांची गरज असेल किंवा इतर कोणती सुविधा घेतली तसेच डॉक्टरांच्या ठरविलेल्यापेक्षा जास्त भेटी घेतल्यास त्याचे वेगळे पैसे आकारण्यात येतील.
- आपल्याला रुग्णालयाच्या वेळा व नियम पाळणे बंधनकारक आहे.
- डॉक्टरांच्या उपलब्धतेनुसारच आपली तपासणी होईल.
- कृपया अपॉइंटमेंट घेऊनच तपासणीस यावे त्यामुळे आपली गैरसोय होणार नाही.
- तपासणी करण्यापूर्वी १२ तास काहीही खाऊ व पिऊ नये. यावेळेत धुम्रपान व मद्यपान टाळावे व सकाळी रुग्णालयात तपासणीसाठी यावे.
- जर आपल्या पॅकेजमध्ये लघवी व संडास तपासणी करण्याचे असेल तर सकाळी येताना लघवी व संडासचा नमुना सोबत घेऊन यावा. त्यासाठी लागणारे साहित्य रुग्णालयातून घेऊन जावे.
- आपणास काही आजार असेल व त्यासाठी काही औषधे आपण घेत असाल तर ती औषधे ठरलेल्या वेळेतच थोड्या पाण्याबरोबर घ्यावीत व आजाराची कागदपत्रे व माहिती डॉक्टरांना द्यावी.
- जर आपण ठरलेल्या वेळेत येणार नसाल तर तसे आधीच रुग्णालयात कळवावे.
- जर आपण आपल्या कंपनीतर्फे आरोग्य तपासणी करण्यास आला असाल तर तसे कंपनीचे पत्र सोबत आणावे.

## नोट :-


- सार्वजनिक सुट्टी व रविवार सोडून तपासणीची वेळ घेता येईल.
- पॅकेजेस्चे दर कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय बदलू शकतात



दि. २९ डिसेंबर रोजी आपल्या रुग्णालयात दंत विभागाच्या शुभारंभाप्रसंगी रुग्णालयातील देणगीदार डॉ. मंदाकिनी चिटको यांचा सत्कार करताना मा. श्री. भैय्याजी जोशी ( सरकार्यवाह, रा. स्व. संघ ) व प्रमुख पाहुणे श्री. मनोज टिबरेवाल



डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुप्रिया देवरे रुग्णांची तपासणी करताना



डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त रुग्णालयात आयोजित कार्यक्रमात प्रतिमापूजन करताना वनवासी कल्याण आश्रमाचे प्रांत संघटन मंत्री श्री. संजय कुलकर्णी

## वाजवी दरात योग्य उपचार

ह्या प्रकल्पासाठी दिलेली देणगी आयकर अधिनियम ८० जी व अधिनियम ३५ ए.सी. अंतर्गत आयकर सवलतीस पात्र आहे.
कृपया देणगीचा धनादेश अथवा डी.डी. श्रीगुरुजी रुग्णालय (८० जी करीता)किंवा
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान (३५ ए.सी करीता)या नावाने काढावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
**श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक**
आनंदवल्ली चौक, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.
दूरध्वनी - २३४२४०१, २३४३४०१
मो. : ८३८००११२८६
website - www.shrigurujirugnalaya.com

प्रिंटेड मॅटर - बुक-पोस्ट
प्रति,
___________________________
___________________________
___________________________